# नगर परिषद कार्यालय, भंडारा

## जाहीर सुचना

### मुलाखत कार्यक्रम

नगर परिषद गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मौलाना अबुल कलाम आझाद उर्दु हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय व शहिद भगत सिंग प्राथमिक शाळा नगर परिषद भंडारा करिता खालील प्रमाणे कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर शिक्षकांची आवश्यकता आहे, अश्या स्वरुपाची जाहिरात दि. १४/०९/२०२१ रोजी लोकमत या वृत्तपत्रात नगर परिषद भंडाराद्वारे प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार विहित वेळेत एकुण २७२ अर्ज प्राप्त झाले आहेत. खालील तक्त्यात नमूद केलेल्या प्रयोग शाळा सहायक पदाव्यतिरिक्त इतर सर्व पदांकरिता पात्र उमेदवारांची मुलाखत कार्यक्रम :

१) खालील तक्त्यातील अनुक्रमांक १,२,३,४,५,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७ (प्रयोगशाळा सहायक पद वगळून) खाली असलेल्या पदांसाठी : दि. २२/११/२०२१ व

२) तक्त्यातील अनुक्रमांक ०६ (प्रयोगशाळा सहाय्यक) खालील पदांसाठी : २३/११/२०२१ रोजी नगर परिषद कार्यालय भंडारा येथे घेण्यात येईल तरी सर्व शैक्षणिक व व्यवसायीक पात्रता असलेल्या उमेदवारांनी नगर परिषद कार्यालय भंडारा येथे सकाळी १० वाजता हजर राहावे. (सोबत दिलेल्या अटी व शर्तीमध्ये देण्यात येणारे मानधन नमूद केलेले आहेत.)

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | विषय | शैक्षणिक पात्रता | पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | नगर परिषद गांधी कनिष्ठ महाविद्यालय, भंडारा (वर्ग ११ व १२) | इंग्रजी | जीवशास्त्र | एम.एस.सी., प्राणीशास्त्र (Zoology) किंवा वनस्पतीशास्त्र (Botany)(किमान द्वितीय श्रेणी) व बी.एड् (किमान द्वितीय श्रेणी) | १ |
| २. | | | भौतिकशास्त्र | एम.एस.सी., (किमान द्वितीय श्रेणी) व बी.एड् (किमान द्वितीय श्रेणी) | १ |
| ३. | | | रसायणशास्त्र | एम.एस.सी., (किमान द्वितीय श्रेणी) व बी.एड् (किमान द्वितीय श्रेणी) | १ |
| ४. | नगर परिषद गांधी विद्यालय, भंडारा | सेमी इंग्रजी/ मराठी/हिंदी | गणित | बी.एस.सी. (Maths)(किमान द्वितीय श्रेणी) व बी.एड् (किमान द्वितीय श्रेणी) | २ |
| ५. | | | विज्ञान | बी.एस.सी. (Bio)(किमान द्वितीय श्रेणी) व बी.एड् (किमान द्वितीय श्रेणी) | २ |
| ६. | नगर परिषद गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय | प्रयोगशाळा सहाय्यक | | किमान एच.एस.सी. उत्तीर्ण (विज्ञान) | १ |
| ७. | मौलाना अबुल कलाम आझाद उर्दु हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय | उर्दु | गणित | बी.एस.सी.(गणित) व बी.एड. | १ |
| ८. | | | इंग्रजी वांङ:मय | बी.ए.(इंग्रजी वांङ:मय) बी.एड./बी.पी.एड. | १ |
| ९. | | | विज्ञान | एच.एस.सी. (विज्ञान)/ बी.ए./बी. एस.सी. डी.एड./ बी.एड./बी.पी.एड. | १ |
| १०. | | | भुगोल, इंग्रजी | एम.ए.(भुगोल, इंग्रजी), बी.एड | १ |
| ११. | | | इतिहास, राज्यशास्त्र | एम.ए.(इतिहास, राज्यशास्त्र), बी.एड | १ |
| १२. | | | उर्दु, पर्शियन | एम.ए.(उर्दु, पर्शियन), बी.एड | १ |
| १३. | | | मराठी | एम.ए.(मराठी), बी.एड./बी.पी.एड. | १ |
| १४. | डॉ. झाकिर हुसैन उर्दु प्राथमिक शाळा न.प. भंडारा | उर्दु | वर्ग १ ते ४ | एच.एस.सी., डी.एड. | ३ |
| १५. | | इंग्रजी | नर्सरी, के.जी.१ | एच.एस.सी., डी.एड. | २ |
| १६. | | उर्दु | के.जी.2 | एच.एस.सी., डी.एड. | २ |
| १७. | शहिद भगतसिंग प्राथमिक शाळा नगर परिषद, भंडारा | मराठी | वर्ग १ ते ७ | बी.ए.,डी.एड. | २ |

**सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती ही मानधन / कंत्राटी स्वरुपाची असुन उपरोक्त शिक्षकांचे नियमित (पुर्णवेळ) पद भरेपर्यंत अथवा सत्र २०२१-२०२२ अखेर यापैकी जो कालावधी अगोदर येईल त्याप्रमाणे राहील.

२) सदर नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची निश्चित मानधनावर असल्यामुळे कायम नियुक्तीशी याचा कोणताही संबंध राहणार नाही अथवा उमेदवारास नियमित सेवेत सामावुन घेण्याकरीता कुठल्याही प्रकारचा दावा करता येणार नाही, अशा प्रकारचा करारनामा लिहुन देणे अनिवार्य राहिल.

३) सदर आध्यापनाचे कामाकरीता नगर परिषदेने ठरविल्यानुसार कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना (वर्ग ११ व १२) दरमहा मानधन रुपये १०५००/- (दहा हजार पाचशे रुपये), माध्यमिकच्या शिक्षकांना (वर्ग ५ ते १०) दरमहा मानधन रुपये ८५००/- (आठ हजार पाचशे रुपये), प्राथमिक शिक्षकांना (वर्ग १ ते ७) दरमहा मानधन रुपये ५५००/- (पाच हजार पाचशे रुपये), कॉन्व्हेंट शिक्षकांना (नर्सरी, के.जी.१, के.जी. २) दरमहा मानधन रुपये ५०००/- व प्रयोगशाळा सहाय्यक रुपये ४५००/- (चार हजार पाचशे रुपये) दरमहा मानधन (दिर्घ सुटीचा कालावधी वगळुन) देण्यात येईल.

४) उमेदवारांची निवड व्यवसायीक पात्रता/ एम.एस.सी./बी.एस.सी./ एच.एस.सी. व इतर च्या प्राप्त गुणांच्या व सदर कामाच्या अनुभवाच्या आधारे करण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
नगर परिषद, भंडारा